# रिमझिम



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १३९८
१८५३

REFBK-0008076
REFBK-0008076

द. चिं. सोमण.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम
क्रमांक

वि:
नों: दि:

दा. क्र.

# झिमझिम

[ काव्यसंग्रह ]

★

द. चिं. सोमण

REFBK-0008076
REFBK-0008076

वाशीम १९५३ ]

[ मूल्य बारा आणे

प्रकाशक
श्री. द. चिं. सोमण,
वाशीम.

मुद्रक
पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी.
व्यवस्थापक, नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर.

—सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन—

एकमेव विक्रेते
श्री. कुंडलराय मोहेकर,
'पराग प्रकाशन'
पराग बिल्डिंग्ज, धरमपेठ, नागपूर.

# अगोदर—

'झिमझिम' हा माझा दुसरा काव्यसंग्रह आज प्रसिद्ध होत आहे. पहिला 'भावना' हा संग्रह १९३८ सालीं प्रसिद्ध झाला.

'झिमझिम' या संग्रहांतील सर्वच अठ्ठावीस कविता यापूर्वी निरनिराळ्या नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रकाशित झालेल्या आहेत. प्रत्येक कवितेच्या शेवटीं त्या त्या नियतकालिकाचा उल्लेख मी केलेलाच आहे.

संग्रहांतील 'करपुतळींत' सारख्या कांही कवितांना मानसशास्त्रांतील 'अंतर्मन प्रतीकांची भाषा वापरतें' या सिद्धांताचा आधार आहे हें लिहायला नकोच !

प्रस्तुत संग्रह प्रसिद्ध करतांना अनेक सन्मित्रांचें मला साह्य झालें; विशेषतः प्राध्यापक लेखक प्र. वा. उर्ध्वरेषे, एम. ए., खामगांव, सुप्रसिद्ध कवि श्री. शरत्चंद्र मुक्तिबोध, सुषमा या प्रसिद्ध मासिकाचे संपादक श्री. कुंडलराय मोहेकर व माझे कवि मित्र श्री. शा. रा. साधु, वाशीम इत्यादिकांच्या मदतीशिवाय हा संग्रह प्रसिद्ध करणें मला शक्यच झालें नसतें ! या सर्व मित्रांचा मी ऋणी आहें !

नारायण मुद्रणालयाचे श्री. पां. ना. बनहट्टी यांनी अवघ्या दहाबारा दिवसांत हा संग्रह अतिशय काळजीपूर्वक छापून दिला याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों ! त्यांचा माझा पूर्वीचा परिचय मुळीच नसतांनासुद्धा त्यांनी ज्या आस्थेने 'झिमझिम' हा संग्रह मला छापून दिला ती आस्था मला उल्लेखनीय वाटते !

एवढेंच !—

९ आक्टोबर १९५३ द. चिं. सोमण

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ प्रतीकात्मक जीवन | ५ |
| २ प्रेमाविषयी | ८ |
| ३ रात्रीं | १० |
| ४ कालाब्धींत | १३ |
| ५ वियोगीं दारुण | १४ |
| ६ हेंच तुझें रूप | १५ |
| ७ साक्षात्कार | १७ |
| ८ कातरवेळीं | १८ |
| ९ पहा पाखरूं मला गवसलें | २१ |
| १० प्रेक्षका | २३ |
| ११ हृदयदान | २५ |
| १२ मेघमल्हार ऐकतांना | २७ |
| १३ देव बोलला | २९ |
| १४ शंका | ३१ |

| विषय | पृष् |
| --- | --- |
| १५ झिमझिम | ३ |
| १६ स्वप्नरंजन | ३ |
| १७ शांतम्–दह ! | ३ |
| १८ ऐक मानवा | ३ |
| १९ दैत्य मस्तकीं | ३ |
| २० उन्हांत तांबूस | ४ |
| २१ साद–पडसाद | ४ |
| २२ उजाडतांना | ४ |
| २३ बरें होतें द्वैत | ४ |
| २४ परोक्ष आत्मज्ञान | ५ |
| २५ करपुतळींत | ५ |
| २६ त्याची आत्महत्या | ५ |
| २७ मार्गदर्शक | ५ |
| २८ दिव्य काननीं | ५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ९०२०५ वि: ३/०५
क्रमांक ९३९८ नों: दि
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०५

# प्रतीकात्मक जीवन

कुणा मानवाचा जीवनानुभव
प्रतीकात्मक
दावीत आहे मज ही सरिता प्रवासांत माझ्या

निर्मल मंगल उषेच्या करांनी
ठेवितां खाली हळूच भूवर
निघे वाहिनी जीवन-वाहिनी
शिकत वहाया.

गुलाबी धुक्यास बाल्यावस्थेच्या
टाकीत मागे आतुरतेने
घेत वळणें तंद्रींत आपुल्या
आलें येथवर जीवन सहज.

येथे मात्र हा ऐन मार्गांत
ठाकला राक्षसी कडा तुटलेला स्वप्नभंगाचा !
कोसळतां ओघ वेगें अवचित
हाय ! केवढें अधःपतन !

फेसाळे, खळाळे, होई गढूळ,
करी गर्जना देत धडका,
परी या जीवना धराया तोलून कुणास बळ ?
अथवा चढावा कसा ह्याने कडा
अधःपाताच्याच आधारावर ?

पिसाट गर्दी    कांटेरी वृक्षांची    वेढीत ह्यास,
पतनामुळेच    मिळतां जीवन    आलीं आकारा
दुष्कर्मांचीं हीं    भेसुर पिशाच्चें
विवेकबुद्धीस    काढितीं सोलून
कंटकांनी जीं,
आणि हे भोवरे    पात्रामधले    कुविचारांचे
आहेत गुंग    क्रीडेंत निर्भय!

वळे अकस्मात    तांबूस लोंढा
जणू कुणाची    ऐकून हाक    बदली दिशा
मंत्रमुग्ध हा
परी दिशाभूल    मुळी न झालेली
सुरेख संगम    जाहला येथे
संथ अथांग    कुणी तरंगिणी
घेई सामावुनी    आपल्या अस्तित्वीं    सुदैवें ह्यास
करीत शांत    आलिंगनांत!

येथून आता    निराळेंच सारें,
अनेक कालवे,    विद्युत–यंत्रें,
विस्तीर्ण बागा,    उद्यानें सुरम्य,
मचव्यांतील    व्यापारी माल,    माशांचें पीक,
तटावरचें    वरुण मंदिर
लावीत आहेत    जीवन सार्थकीं!

आकाशांतला नीलिमा विशुद्ध
बिंबला आहे पात्रीं काठोकाठ
सुचवीत जणू अंतरांतील
तात्त्विक विचार समाधान, शांति !

हळूच वळला जलौघ पुन्हा
दक्षिणेकडे
आणि जाहलें जीवन अदृश्य काळोखामधे
पसरतां रात्र !

—अभिरुचि : डिसेंबर १९५१.

# प्रेमाविषयी

केव्हा, कुठे, कोणीं, कां आणि काय ?
सांगतों सारें--

जेधवा चाले सारा व्यवहार मानवप्राण्यांचा
केवळ खुणांनी भाषेच्या अभावीं.
पारध केलेलें कोवळें श्वापद
प्रथम जेव्हा पडे अग्नींत.
महाकाव्यांची निर्मिति जधी—
परमाणु-शक्ति यदा रमली भीषण तांडवीं
हिरोशिमामध्ये--
आणखी जधी सूर्याचा गोळा थंड व्हावयाचा
काल ये जवळ लक्ष वर्षांनी

जेथे बर्फाचा थर जाडजूड
क्षितिजापर्यंत पांढरा शुभ्र !
संथ अथांग जेथे सरिता
निळसर रम्य--
चकाकणाऱ्या जेथे वाळवंटीं दावी मृगजल
आर्द्रा पर्जन्य—
मेंदीच्या पानांच्या रेखीव सावल्या
जेथे भूवर—
कायमचा जेथे संधिप्रकाश गूढ, उदास-

दोन त्या व्यक्ति
ऐन यौवनीं--
व्हावयाची ती     अति आकर्षित
त्याच्याचकडे,
त्याचीच मूर्ति     स्वप्नांत तिच्या
सुचेना त्यास     तिच्यावांचून     क्षणभर कांही,
तिचीच प्रतिमा     चित्तांत त्याच्या--
बसे तो निश्चल     अनेक वेळां
बावरे तीहि     कसल्या तरी     तंद्रींत कुठे--

उमा-महेश्वर,     आदाम-ईव्ह
ह्यांनी जें केलें—
सागर-सरिता,     रजनी-चंद्रमा
हृदयाची हाक     आणिक मानव,
निर्मल भावना     आचार आणि
करितील जें—

तेंच केलें त्यांनी !
परस्परांच्या     अस्तित्वीं विलीन
जाहलीं तीं दोघें !

—अभिरुचि : जानेवारी १९५१

# रात्रीं

आकाशाच्या विशाल पात्रीं
द्रावण करिते वेडी रात्री
स्फटिक तयांतिल अनंत कोटी
ढवळुन ढवळुन विरघळवी ती
लहान मोठे क्रमें लोपतां
चढू लागते द्रवा शुभ्रता
अंतिं धवळतां काळा पेला
टाकुनि जाते निजधामाला
सायंकाळीं दुसऱ्या दिवशीं
परतायाला गेली तैशी
द्रवांत इकडे स्फटिक पुन्हा पण
तसेच बनवी सुस्थिर द्रावण
काळाठिक्कर पुनरपि हो द्रव
पुन्हा धवलता रात्रीं दे नव
अशा तमींच्या गमनागमनीं
युगें लोटलीं कधीपासुनी
कुणास ठावें प्रश्न कशाला
वेडीची ती प्रयोगशाळा
उद्देश का विशिष्ट असला
प्रयोग अविरत तिचा चालला

गतकालाचा मग का जमणें
तर्क कुणाला कधीं चिंतने
अथवा कळणें थांबणें कधीं
पिशी तमिस्रा स्वकार्यांमधि

—'पिशी' परी कां तिला म्हणावें
बुद्धिहीन जन कां न गणावें
या, लव लक्षूं गत इतिहासा
बघूं कुणाचा हुकमी फासा
मानाचीं ज्यां नंतर दानें
अप्रबुद्ध ते आधि भासणें
प्रारंभींचे खुळे शेवटीं
मान्य अलौकिक जगतीं ठरती
आर्किमिडिज पथिं विवस्त्र धावे
त्यागी गौतम राज्य-वैभवें
चालिय शिकंदर अश्रू ढाळी
कोलंबस तो नौका ढकली
विजनिं ओरडे डेमॉस्थेनिस
पर्णें जमवी डार्विन निरलस
आज वाचनें साक्रेटिसचीं
गॅलिलिओला जनता जाची
अशा दाखवूं कितीक व्यक्ती
वरचढ पटतां गातो महती



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १०८०८ दि. ५/०/८५

कवि एखादा कागद फाडी
चित्रकार कुणि रेघा ओढी
पतंग कोणी उडवित राही
वाफ निसटती कोणी पाही
आमुच्यांतला खेळ हा खुळा
दोष वृथा कां मग रजनीला
कार्य साधणें असेल कांही
ज्याच्यासाठी येत जात ही
ध्येयप्राप्ति नच वेड न जडतां
प्रगति खुंटते पिसें न भरतां
वेड सपद्धत जेथे दिसतें
तिथे पडावीं पुष्पें हस्तें
ओथंबावे तेथे लोचन
भावसुमांचें व्हावें विकसन
हेंच शिकविलें अजवर काळें
पटवुन घेणें केवळ उरलें
तोंवर थांबो जग हें रजनी !
निंदो तुजला नच अज्ञानीं !

—युगवाणी : जुलै १९४७

## कालाब्धींत

विश्वाचें प्रतीक   अनादि अनंत
कालाब्धि अथांग   भरे अघटित
इतका व्यापक   पूर्ण निराकार
इतका निश्चल   फुटे न तुषार
संचयीं निःशब्द   अशा विलक्षण
वस्तुजात सारी   करी पर्यटन
घन, खग, नग,   सरिता, तारका
नौकासमूहांत   अब्जावधी नौका
व्हावयास पार   गूढता अपार
चाले अविरत   स्पर्धा अनिवार
सदा गतिमान   अंतःप्रेरणेने
डुलत चाललीं   कैक जलयानें
अद्‌भुत संचारीं   नौकांच्या सगळ्या
गति आणि दिशा   वेगळ्या वेगळ्या
ज्यांच्यामुळे होती   दृष्टिभ्रम नित्य
सत्याच्या आधारें   गोचर असत्य
डोलकाठी कुठे   दृष्टीस पडत
अंकुर जेधवां   भूमींतुन येत
पाहतां पाहतां   विकसे कलिका
संमुख जाहली   गमनांत नौका
विनष्ट. तिकडे   मंदावत ज्योत
प्रयाणांत यान   दृष्टिआड होत !

—आत्मोन्नति : एप्रिल १९४८.

## वियोगीं दारुण

वियोगीं दारुण
पाखडी मी प्राण !

जनींहि विजनीं
उद्गाता मी मौनीं
विदग्ध अश्रूंनी
अमृत जीवन

मनाचें मंदिर
स्व-रूप साकार
प्रशांत गोचर
श्वापद भीषण.

पटलें अद्वैत
अखंड द्वैतांत
निस्वार्थी स्वार्थात
अपूर्ण मी पूर्ण.

पुरूष प्रकृति
एकत्व विवर्ती
तटस्थ ती मूर्ति
निष्ठुर निर्गुण !

—अभिरुचि : जून-जुलै जोड अंक १९५०.

## हेंच तुझें रूप

हेंच-हेंच तुझें रेखीव रूप
भाविकपणें तन्मय होऊन रंगविलें जें
धवल मृदुल दलादलावर
करून कुंचले नाजुक अगदी
पापण्यांचेच
नेत्रीं साठलेल्या पुष्पसृष्टींतल्या
सुरम्य रंगांच्या बिंदुबिंदुमध्ये
करीत मिश्रित
नयनोदकाचे पवित्र बिंदु !

हेंच तें रूप
गोचर जें झालें स्वप्नांच्या जगीं
–कधी उदधीच्या निळ्या पृष्ठावर
सूर्यबिंबापुढे
निळ्या शीडाच्या नौकेंत निळ्या,
–कुठे गिरीवरी
फलभारनत जांभळीखाली
गर्द सावलींत,
–हिरव्या कुरणीं

रानटी फुलांच्या पिवळयाधमक द्वीपावर सान,
–केधवा दर्पणीं हृदयाकार
सहज वळतां नजर तिकडे !

हेंच तुझें रूप चिरपरिचित
प्रथम दर्शन घडवी आज
सत्यसृष्टीमधे
हृदयदेवते !

—अभिरुचि : जून १९४८.

## साक्षात्कार

आसवांच्या पडद्यामधून
घडे तुझें प्रत्यक्ष दर्शन
सत्य विभो ! तूंहि उत्कंठित
भक्तास्तव व्हायास प्रगट
निराकारा झालास साकार
वन्हिरूपें भवताल घोर
दिव्यत्वाचा साक्षात्कार झाला
प्रगटतां दाहक ह्या ज्वाला
निर्गुण तूं होतांच सगुण
भडकला क्षणीं कणकण
पटे तुझा वास चराचरीं
उफाळतां अग्निजिव्हा वरी
तेजोमय प्रभो ! प्रगटून
केलें भक्ता जगीं धन्य धन्य
जीवन का विशुद्ध कराया
जाळपोळ अशी निरामया !
बाष्पीभूत अश्रूंचीं तोरणें
परमेश ! तुझिया दर्शनें !

—आत्मोन्नति

# कातरवेळीं

कातरवेळीं
येऊन अशी अवचित तूं
राहिलीस उभी अंगणीं माझ्या !

प्रभातीं आजच
किती वाटलें प्रगटावेस तूं
पसरलेल्या दाट धुक्यांतून
आणखी मग बालार्क भगवा
विरवूं लागतां धवल घन तो
घ्यावा मी हातीं तुझाच हात
धुक्याहून शुभ्र उन्हासारखा कोवळा कोवळा
परंतु केलीस निराशा माझी !

दुपारींहि आज
होता लकाकत माथ्यावरती जेधवां सूर्य
करीत तेजस्वी सिद्ध शिलेपरी
आकाशांतला एकला ढग
तरीहि जधी
गारठा होताच झोंबत देहास

होतों तदा किती
आसुसलेला
तुझ्या कायेचा स्पर्श ऊबदार अनुभविण्या
दृढालिंगनीं !
दिसलीस न पण नयनां !

संध्याकाळींहि तसेंच झालें
पश्चिम दिशा दिसत होती
बुडवून कुणी जणू काढलेली सोन्याच्या रसांत
अस्ताद्रिवरचा दिघसमणि
होऊन मंद आणिक लाल पिवळट जरा
दावित होता आकार आपुला
रेखीव वाटोळा
तरूंतरूंतून अनेक खग
आलापित होते
कुठलासा एक अनाम राग उत्कट भारी
वाटलें तेव्हा
असावीस तूं समीप माझ्या
आणि मी बघत सुरेख चेहरा
तुझा गोल गोरा

म्हणावें तुज,

“सखे ! तें गा गे ! गान आवडतें

आपणां दोघांचें !”

तथापि तदाहि तूं न येतांच

काळवंडलें सुरम्य नभ

जाहला मूक पक्षीगण सारा !

—आणखी आता

क्षणापूर्वीच म्हटलें मनांत

कातरवेळीं अमंगल अशा यावी न ती गेहा !”

—आणिक आलीस

नेमकी आताच !

—सागर : जून १९४७

## पहा पाखरूं मला गवसलें

गोजिरवाणें जगावेगळें
पहा पाखरूं मला गवसलें !

जुना कधीचा गेहीं पिंजरा
पडला होता जमवित कचरा
अडगळ केवळ होत बिचारा
बेसावध कुणि कधि ठेचाळे—

जागोजागीं गंज अघाशी
अर्धेमुर्धे गज विध्वंसीं
बेपत्ताही कांही ग्रासीं
कुडी खिळखिळी किती खुळखुळे—

चाप निखळुनी कधीच पडला
दारच नसतां हवा कुणाला
किति खिंडारें दार कशाला
नवलच टिकलें उरलें सुरलें--

पंजर असला किती ठेवणें
आज ठरविलें फेकुन देणें
मुहूर्ताचि कां वाट पहाणें
आणि अंगणीं त्यास आणिलें—



६०६५

एक पांखरूं तोंच अचानक
कुठूनसें ये अति आकर्षक
तडक पंजरीं शिरलें आणिक
किलबिल किलबिल करूं लागलें—

काय पांखरूं लोकविलक्षण
पिंजऱ्यामधें घुसले आपण
किलबिल थयथय गायन नर्तन
समजा कांही रुतलें खुपलें !

—सुषमा : मार्च १९४९.

## प्रेक्षका !

वाऱ्याचे झोत येणारे जाणारे
जातां डोलवून चारी दिशांस
पळसांचीं फुलें गुल्मोहर–तुरे
तांबड्यालाल विजयपताका
लागल्या आत फडफडावया
क्रांतिकारक ऋतु ग्रीष्माच्या !

वन्हिसायक रविकर कोटि
जळत आणि उजळवीत
सारे चराचर
येऊन ठेपले मेदिनीवर
बनलें भुवन दिव्य अग्निकुंड
पावकमय !
घालीत आडवे प्रचंड वृक्ष
कुंडांत इंधना
आणि उठवीत फिरवीत स्तंभ
विराट, तांबूस, धूसर, गाढ
तप्त धुळीचे
भासतात जे धूमाचेच लोट
वारा तापलेला करी गर्जना
गभीर गूढ
यज्ञदेवाचा चाले स्तुतिघोष !

दिपवीत दृष्टि घडकलें कुंड
याच कुंडांतून परी यावयाची
याज्ञसेनी तो,
पंचभूतांची पांचाली दुजी,
पुष्पालंकारें भूषवून तनू
लेवून हिरवें मनोरम वस्त्र
लावण्यखनी स्मित–वदना
तोवर धीर घर प्रेक्षका !

—युगवाणी : मार्च १९४६

## हृदयदान

अंधारावांचून कुणी न सोबती
तरीहि आलीस
तिथल्या ओसाड गढीजवळून
ऐकत घूत्कार अशुभ भयद,
पलीकडच्या पिंपळाखालून भुताटकीच्या
तूंच ना मजला सांगत होतीस
भितात जावया दुपारींहि तेथें गुराखी, गुरें !
ओलांडलास चिंचेचा ओढा
बसतात जेथे टपून लपून श्वापदें हिंस्त्र !
पाऊलवाट भयाण अशी तुडवीत सखे !
आलीस कशी पुरुषी धीराने !

इकडे मात्र
अति हळुवार हृदय माझें
करीत होतें प्रतीक्षा तुझी क्षणाक्षणाला
किती कुशंकांनी हृदयास या दिले चटके
मिटतां लोचन
घूकांचें जोडपें खांद्यावर माझ्या बसून करी
बिकट घू: घू:

दिसे तो पिंपळ
आणि वसतीचा    ब्रह्मसमंध
पळी पंचपात्री    वाजे खणखण
ओढयाच्या पाण्यांत चक्क चमकले
मृत्यूचे डोळे !
जाऊन सारा    खंबीरपणा    पुरुषी पूर्वीचा
करी कासावीस    भावनेची कळ    कोमल हृदया
पाडी नेत्रांतून    पर्जन्य अश्रूंचा !

पटलें आज    हृदयें आपण
दिलीं परस्परां !

—सत्यकथा : जून १९५१.

## 'मेघमल्हार' ऐकतांना

बसुनि हादरा प्रचंड सहसा
भूकंपाचा
कंपित व्हावा मिनार सुदृढ
होत तनूची त्याचपरी गत!
क्षितिज करकरे समीप व्हाया
ध्वनी भयानक गूढ उमटला
असंख्य तारक निखळति भरभर
निळसर हिरवट उजेड पाडित
प्रभा-शलाका उभ्या आडव्या
विणू लागल्या अफाट जाळें
नभा गवसणी चढवित सुंदर
उदित जाहले अष्ट दिशांतुनि
गोल रुपेरी
पळापळाला दीप्ति वाढती
अंबरमध्या करून काबिज
तेजोगोलक करितां दाटी
उमटवि घर्षण ध्वनी भयावह
उमटवि घर्षण विद्युत्-रेखा
पहा जाहले अवघे गोलक
विधु सोनेरी विद्युत्तेजीं
कलंक त्यांचे होती प्रसृत

तालबद्धता स्पंदानिं आणिक
कलश शशींचे ओतुं लागले
अता कृष्णता
कलंक करितां तयांस अस्थिर
घेतां उसळया !
क्षितिज कण्हाया पुन्हा लागलें
तमसावृत हो आता सारें
मत्त प्रभंजन आला आला
तुषार कसले हे कायेवर
पहा चमकली तिकडे चपला
पुनरपि इकडे तिथे कितितरी
लखलख व्योमीं मुळी न मावे
आली खाली जलधारांवर
भरलें भवतीं अथांग पाणी
घेती झेपा विराट लाटा
हुंकारांनी भरें कापरें
क्षणांत येइल अता मूर्छना
तीच काय ती
गानसमाधि ? !

—तरुण भारत : दिवाळी अंक १९४९

# देव बोलला

देव बोलला, 'होवो !'-झालें

धनकण ऋणकण परमाणूंतिल
तेजोमेघीं वायु गरगरे
माळ रवींची ये आकारा
धरा उपजली, रसांत खदखद
साय दुधावर आल्प्स, हिमालय
अगणित ॲमिबा विशाल प्राणी
निबिड अरण्यें –आणिक मानव !
देव बोलला, 'होवो !'–झालें.

बकाल वस्ती कोंदट घरें
खाटेवरती नट्टापट्टा
तुटून पडला कुणी मद्यपी
बळी व्हावया त्या व्याधीचा !
बॅंड पताका धार विदेशी
अपूर्व लखलख बहु नटरंगी
तार विजेची जोडित असतां
गेला कोणी देवापाशीं !
कुठे मवाली कुठे हवेली
बसला वेढा पेटे दंगा

गेली अब्रू हातोहातीं
रक्त सांडलें कोचांवरती !
अति वर्षावीं पूर लोटले
पुनरपि जलयुग विध्वंसाया
अखंड अश्रू जलीं मिसळले
झंझावातीं आणि उसासे !
देव बोलला, 'होवो !'– झालें.

'होवो आणिक !' देव बोलला,
'होवो ! होवो ! असेंच आणिक !'
देव बोलला परी न झालें
–मानव आता होता ज्ञानी !

धनकण ऋणकण दास तयाचे
तेजोमेघीं त्याची हुकमत
कंठिं आणखी व्योमवाहिनी
अवनीवरती त्याचें 'होवो !'

'ज्ञानतरूच्या फळेंच केला
घात अखेरिस !' देव बोलला
आणि विचारीं मूक राहिला !

—युगवाणी: ऑक्टोबर १९५३.

## शंका

असून जवळ अशी सदाच तूं
किती किती दूर वाटसी परंतू
माझी तूं आजहि आहे तुझाच मी
एकाकी वाटतें तथापि नेहमीं
परकेपणा हा अगदीच नवा
अलिकडे नित्य येत अनुभवा
जाहलें विनष्ट पूर्वीच एकत्व
सामावलें होतें जयांत अस्तित्व
वाटायाचा तेव्हा कवढा उल्हास
पाहून लाभला तुझा सहवास
उभयतांमध्ये व्हावयास आड
घजत नव्हता ज्योतीचा उजेड
हरपायाचेंच भान कितीकदा
पाहतां केधवां तुज तसें तदा
सुरेख नयन आता भासतात
तारायुग्म दूर दूर अंबरांत
विशाल हृदया केलें आकुंचित
तुलाच केवळ द्याया स्थान त्यांत
विशालतेची ती अंतरींची आस
झाली अवचित पूर्ण कां निराश ?
आणखी कराया लागे हद्दपार
हृदयदेवी कां वैतागें अखेर ?

—अभिरुचि : डिसेंबर १९४८.

## झिम झिम

झिमझिम पडे	पाऊस सकाळीं
थरथरतात	अंगणांत वेली
दारांत तूं उभी	होत रोमांचित
पाऊस लोचनीं	तुझिया दिसत !

सांगतें मुखींचें	परी मज स्मित
आनंदाश्रु तुझ्या	लोचनीं दाटत
आठवतो कां तो	तेव्हाचा दिवस
जेव्हा होती दोघां	प्रीतीचीच आस

असेच तेधवां	होत रोमांचित
आनंदाश्रु आणि	लोचनीं बघत
कथिलें हृदींचें	गूज परस्परां
जुळवीत आणि	उत्कट अधरां

—अभिरुचि : जुलै १९४७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम १०८०५ वि: ३/०५
क्रमांक ९३९८ नों: दि: १.५.५

## कल्पनेच्या जगीं

कल्पनानिर्मित नगरीमध्ये
हृदय देवता
कांचन प्रासादीं रत्नमंचकीं
विरहाकुल
प्रियकर त्यांचे कलावंत हे
विरहानलीं लोटून जातां
फुलपांखरांच्या पंखावरती बसून दूर
ऐकाया मधुर सरस्वतीचें वीणावादन,
नसे वसनांचें तयांस भान
विभूषणांचा ये तिटकारा
आणि परततां प्रियकर ते
अतृप्त कर्ण
होती त्या साऱ्या सरोष दूर फिरवून मान,
सापडतां ते तसल्या दुःसह महासंकटीं
मीलनोत्सुक प्रीतिभक्तांचे
ओलावती नेत्र
आणि ते होतां कळवळून नत निःशब्द
कळवळा ये प्रियकरणींना

देती त्यांस प्रेमें    दृढालिंगनें
वदत कांही
वीणारवाहूनी    मधुरतर,
वाटे उणें त्या    प्रियकरांना
देवेंद्रसौख्यहि !

अशी उभारतां    कल्पनासृष्टि
कवटाळितां    अशीं हीं स्वप्नें
कल्पनांची नशा    चढतां अशी
सत्यसृष्टींतील    हाहा:कार आणि
क्षुधेचे बळी,    आसूडांचे वळ,
दु:खें अर्धपोटीं    राबणाऱ्यांचीं
जाणवती नच    कांहीहि त्यांना
बसतां कवाडें    बंद करून
एकांतामध्ये
कल्पनासृष्टींत    कल्पवृक्ष त्यांचे
पुरविती त्यांच्या    सर्व कल्पना
एका स्तंभावर    प्रीतीच्या अशा
कनकमयी    द्वारकेमध्ये
सदैव राहतां    कलावंत ते

जीवनसागर जाइला जरी
गर्जत प्रक्षुब्ध,
अचाट आलें उधाण आणि
उसळल्या लाटा करीत कल्लोळ
एकहि तुषार स्पर्श न करी देहांस त्यांच्या
गर्जना त्याची गभीर गूढ
ह्यांच्या कानीं नच पडे कदापिहि !

करा त्यांची कीव किंवा तिरस्कार
तिथेच सदैव राहणार हे !

—तरुण भारत : तृतीय वर्षारंभांक १९४६

## शांतम्–दह–!

अश्रु–सरोवर तमीं निर्मितां
अघटित दिसला देखावा मज
पाण्यावर शव एक येऊनी
तरूं लागलें जणूं तराफा
उष्णाश्रूंच्या बाष्पांमधुनी
तत् हृदयावर ये आकारा
शोकविव्हला ललना अवचित
रतीच दुसरी विलापमग्ना
काया गौरा वस्त्र काजळी
म्लान सुमांची माला कंठीं
पुसतां कुंकुम कच संभारें
'हाय! हंत! हा!' घाली पिंगा!

प्रेत ललाटीं अन्या प्रतिमा
प्रगट जाहली, कुणी तपस्वी
जटिलो मुंडी लुंचित केशः
करीं कमंडलु भाव 'उग्रता'
वदे तयाची गभीर वाणी
'शांतम्! शांतम् स्मर परमेश्वर!'

फोडित टाहो अधिक तथापी
दुजी जानकी 'हाय! हत! हा!'
युवती शीर्षीं रिक्त कमंडलु
करी तापसी 'ॐ' उद्गारत
क्षणभर झाली निश्चल रमणी
दुज्या क्षणिं परि क्रोधकंपिता
करीं जमवुनी अश्रु आपुले
प्रक्षेपी ते 'दह!' किंचाळत

तापस देहीं चिता भडकली
प्रेतललाटीं भस्माचे थर
गुप्त जाहली ललना सहसा
आणिक गेलें शवहि तळाशीं!
'शांतम्-दह' ही परंतु वाणी
घुमते माझ्या अजून कानीं!

—युगवाणी : फेब्रुवारी १९५२.

# ऐक मानवा !

नभाची जिव्हा      –आकाशगंगा–
लागली वदाया      कधी अचानक
ऐक मानवा !      कथन नभाचें
अवकाश जेथे      आहे मी तेथे      सदा जागरूक
तेजस्वी लोचन      असंख्य माझे
तम गाढतम      आहेत शोधीत
टाकीत जाळून      परस्परांसच      अखंड भ्रमणीं
केव्हा वैतागून,
निखळून कधी      पडत खाली
शिणून अंतीं
गोठून जात वा      जागच्या जागीं
होत निष्प्राण      अतर्क्य थंडीने,
परी आजवर      कुठे न देखिलें      कल्पितोस जें
तमः कलेवर      विराट विरूप      पडलेलें येथे
संवेदनाशून्य      प्रज्ञाशून्यहि
हताश मी आता      अब्जलोचन !
येतील कामीं      कदाचित् तुझे
अंतःचक्षूच,
विजनीं कुठे      बस अंतर्मुख      शोधीत अंतरीं
कल्पितोस जें      बाह्य जगतांत

—तरुण भारत : पंचम वर्षारंभांक १९४८.

## दैत्य मस्तकीं

शय्येवरती  दैत्य मस्तकीं
प्रमत्त होतां  काम विकारें
तरळुनि गेलें  नेत्रांपुढुनी
दृश्य विसंगत  गूढ अकल्पित  क्षणांत एका !
दिसलीं सदनें  लहान मोठीं
जळूं लागलीं  आणि धडधडा
उजेड पडला  लाल तांबडा
चितांमधुनि त्या  आल्या धावत  हमरस्त्यावर
सुरेख तरुणी
फेडित वसनें  जळतीं अपुलीं,
देहापासुनि  अलग होउनि
स्तनयुग्मांचीं  गौर वर्तुळें
होउं लागलीं  भ्रमणीं बेढब !
तोफा अवजड  जागोजागीं  काळ्या प्रगटुनि
'धुडुम्' गर्जुनी  फिरल्या मागे
खाउनि रंजक,
गोल खोलगट  सुमनें तांबुस
उडूं लागलीं  धुरांतुनी त्या
कान झाकुनी  थबे थबकले  नग्न स्त्रियांचे !

वळण घेउनी	आली पलटण	वाजे पडघम
'उजवा डावा'	'उजवा डावा'
मधेच 'सॅल्युट'
निराळाच तो
बोट उंचवुनि	मघलें एकच।
गिरक्या घेउनि	पडतां सुमनें	टिपऱ्यांवरती
फुटले पडघम
हसले सोजिर	जवान सगळे	गाल फुगवुनी

युगवाणी : एप्रिल १९५२

# उन्हांत तांबूस

उन्हांत तांबूस
पडतो पाऊस
थेंब हा एकेक
वाटतो मौक्तिक।
गुलाबी ज्यांवर
अतर्क्य लहर;
आकाशीं अनेक
शिंपले सुरेख
रवीचे किरण
काय ते भंगून
वैभव अद्भुत
खालती ओतीत!
गगन- कमल
सुरक्त उत्फुल्ल
ढाळितें दंवाचे
थेंब वा वरचे
जयांचा वर्षाव
मांडीत तांडव
अतीव मोहक
सौंदर्य- प्रतीक!

दवाच्या मोत्यांच्या
असोत कशाच्या
दाविती सरी या
रंगांची किमया
दाखवी आकाशीं
भास्कर ती जशी !

उन्हांत तांबूस
उघडे पाऊस
पडदा जादूचा
रंगीत मण्यांचा
उठवी लहरी
पवन ज्यावरी
पाहतां पाहतां
अदृश्य हो आता
कितीक ठिकाणीं
साचलें हें पाणी
जयाच्या अंतरीं
आभाळ केशरी
जयांत तरंग
उठती सरंग,
डुलतें प्रत्येक
सुमन नाजूक

जांभळें पिवळें
तांबूस वा निळें !

गुलाबी उन्हांत
सदनें नटत,
गुलाबी उन्हांत
बालकें पथांत,
गुलाबी उन्हांत
अप्सरा सस्मित !

—युगवाणी : जानेवारी १९४६

एकाकीपणाची जाणीव होऊन
साद कधी झाली मनस्वी उद्विग्न
आणि पडसादा साद घाली साद
सादेचे उठले कोटि पडसाद

' पडसादा ! ये, ये– पडसाद कुठे ? '
अवकाशीं साऱ्या कल्लोळ तो उठे !
तप्त वाळवंटीं वाळूच्या वादळीं
गहन काननीं सरितांच्या जळीं
अथांग सागरीं भयाण कुहरीं
विशाल अंबरीं दिशांच्या उदरीं
असंख्य सूर्यांच्या तप्त डफांवर
शशींच्या सोनेरी भव्य झांजांवर
ग्रहगोलांवरी प्रभाळ सुंदर
नादले ते बोल गभीर गभीर !
नादली ती वाणी गुंजारवांतूनी
स्वर्गीं अप्सरांच्या नूपुरीं कंकणीं
कल्पद्रुमपर्णीं वदलीं ते बोल
सरस्वतीवीणा आणिक मंजुळ

‘पडसाद कुठे ?’ म्हणे कासावुन
चिरायु कालाचा आणि क्षण क्षण !

–‘पडसाद कुठे ?’ पुसे विश्व सारें
शोधाया निघाले स्वर्गांतले वारे
लागलें धावाया व्योमगंगाजल
त्वरित निघाल्या तारका चपल
रुद्रवीणाघोष शेषाचे फूत्कार
स्वर्गसुमगंध शोधिती आतुर
अवकाश पाही तारांच्या नेत्रांनी
अवघी निर्मिति फिरूनी फिरूनी
तेजाचे किरण लागले धुंडाया
लागला पळाया काळहि तो वाया !

–अचानक आणि होई विश्व शांत
सादेच्या सादेचा पडसाद लुप्त
अचानक आणि झाली नभोवाणी
‘साद पडसाद एकरूप दोन्ही !
प्रभूच्या अंतरीं विश्वाची निर्मिति
विश्वनिर्मितींत प्रभूचीच मूर्ति

पडसादीं वसे सादेचीच साद
सादेंत वसतो आणि पडसाद
पडसाद कुठे? सादेच्या अंतरीं!
पडसाद बोले सादेची वैखरी
नाममात्र भिन्न साद पडसाद,
एकरूप दोन्ही पडसाद साद!!'

ऐकूनी ती वाणी आणि अर्थपूर्ण
सादेने मानिलें स्वतालागीं पूर्ण!
एकाकीपणाची जाणीव नुरली
साद पुन्हा कधी उद्विग्न न झाली!

—युगवाणी : एप्रिल १९४६

## उजाडतांना–

शुक्र–तारका लुप्त जाहली
पूर्व फाकली, उमलुं लागली
ये हळू हळू मंद तेज तें
नी कुठेतरी सहज साचतें
हो प्रतिक्षणीं स्पष्ट निर्मिति
दृश्य जाहल्या कैक आकृती
प्रखरलें कसें तेज अवचित
लख्ख उजळले तुंग दिग्तट
अब्धि दीप्तिचा भव्य प्रगटुन
जाहलें सुरू गूढ मंथन
लाट लाट ये आपटे फुटे
पसरतां करें रंग उधळिते
व्योम रंगलें रंगली धरा
रंग बघ चढे ह्या चराचरां
एक, दोन—छे! रंग तरि किती
काय रम्यता ! रंगसंगती !
नेत्र वळविते पूर्व केशरी
उपदिशा दिशा आणि शेंदरी
घन तरंगती नीलिम्यावरी
पीत, लाल वा गाढ तपकिरी

अद्रि तेथला उंच एकला
जांभळा जरा आणखी निळा
वळण वाहिनी घेत धावतां
कनक चमकतें जल खळाळतां
पांढरें धुकें येथ तरळतें
कुरण पोपटी लवच झाकितें
तरुलता पहा हरित तरि किती
पारव्या छटा ज्यांत खेळती !
पुष्पसृष्टि ही रंगदेवता
सर्व ही इथे रंग नी छटा
फिकट किरमिजी लालबुंद वा
शुद्ध मोतिया अंजिरी नवा
इंद्रचाप का येत भूवर
होउनी परी अधिक सुंदर !

दृश्य दिव्य जी निर्मि गूढता
तीच मजसि दे विश्वि 'अस्मि'ता
दिव्यतेंतला मी प्रभा-कर
गूढतेंतला अंश गोचर !

—अभिरुचि : ऑगस्ट १९४९.

# बरें होतें द्वैत !

मज निराधारा बरें होतें द्वैत
बसे आळवीत सदाकदा
तुझिया चिंतनीं रमतां मानस
सौख्याची आरास जीवनांत
शांति अंतरींची लोपतां कधी न
किती समाधान अनुपम
समाधाना पोटीं उचंबळे सुख
केवढें कौतुक माझें मज
अवघें अर्पिलें तुझ्या पदांवर
मानून आधार एकमेव
जय अपजय मान अपमान
आणि पापपुण्य भेद नाही
होतां एकरूप आज अवचित
कठोर अद्वैत नशीबांत
आता मी एकला खरा निराधार
माझ्या पदांवर माझें शीर्ष
माझेंच मजसी आता समर्पण
माझेचि चरण आधारासी
लोपली ती शांति समाधान सुख
आता मी दुर्मुख चिरकाल !

— सत्यकथा : एप्रिल १९५१.

## परोक्ष आत्मज्ञान

असेंच कितीदा आताशा होतें
अलौकिक शांति अशी लाभते

दिसतां प्रभातीं कुठे नयनां
नाजुक कलिका उमलतांना-

माध्यान्हीं भास्कर दाखवी जधी
वाहिनींत रस रुप्याचा कधी—

निशीथसमयीं खद्योत पुंज
वृक्षांस अर्पितां पाचूंचा साज-

भरे शांति मनीं अपरंपार
इतर जगाचा पडतो विसर.

निसर्ग-सौंदर्य दर्शवी कांही
आत्म्यास माझिया जें न मी पाहीं

आत्म्याच्या शांतींत शांति माझीहि
आत्मज्ञान असें परोक्ष होई !

—अभिरुचि : जून १९४९.

# करपुतळींत

शिणले डोळे
झालीं बुबुळें  जणु लोखंडी  भासवि जडता
फिरूं लागल्या  कळा भयंकर
खालीवरती  डाव्या हातीं
आणि प्रगटला  प्रकाशबिंदु  तळहातावर
प्रभा जयाची  पसरूं लागली  पिवळट पिवळट,
विस्तृत वलयीं  अंतिं विरघळे
प्रभाळ तारक  तेजोभव तो !

दिसूं लागलें  दृश्य नीटसर
गोचर झाली  नग्ना कोणी  रम्य अंगना
नर्तनिं तन्मय !
काय नृत्य पण  लोक विलक्षण !
चपल सव्य करिं  बाण रुपेरी
असेल लांबी  पूर्ण पुरुषभर,
हस्तीं दुसऱ्या  घट कनकाचा
वक्त्र जयाचें  बदामाकृती
रुधिर जयांतील  ओती रमणी  मधेंच केव्हा
खदखद हासत  बाणावरती,
अवतीभवती  दगडी पुतळे  कैक गजांचे
तथापि शुंडा  सजीव ज्यांच्या  करीत वळवळ
क्षणांत केव्हा  प्रदीर्घ होउन

करीत धडपड ओढुन घ्याया नग्ना युवती !
अवचित होई एक यशस्वी शुंडा चंचल
गेली ललना शरकलशासह
पुतळ्या सन्निध !

प्रकाशवलया घेत कर्षुनी पुन्हा प्रगटला
तेजोभव तो,
प्रभाळ तारक पुन्हा लोपतां
तळहातावर उरे काजळी
भोवतालच्या अंधारासह !

—अभिरुचि : मे १९५१.

## त्याची आत्महत्या

लावण्य संचयीं
दिघली लोटून तयाने काया !

महाकाव्याच्या सुरेख भव्य कथानकाची
जणू बैठक
सिंहासन त्याचें
उत्तुंग कडा संगमरवरी !

होती पौर्णिमा
माथ्यावरती वर्तुळ चंद्राचें मोहक नाजूक
प्रभा आकर्षक
भरे काठोकाठ क्षितिजापर्यंत आसमंतांत
कुणा महर्षीची बुद्धाची येशूची
शांति अंतरींची वाटावें थाटली !

विशाल सागर
गगनच जणू फिरलें माघारीं क्षितिजापासून
जसा परतावा पुन्हा जगज्जेता
होऊन स्मरण

कुठे न कांही उरे जिंकाया !
नभींचा नीलिमा पीत मंदतम लवच हरित
तोच उदधींत
लोचनद्वयीं विशाल नील
बिंबलीं किंचित्
प्रथम मीलनीं मधुर अपेक्षा ?

नक्षत्रें अस्पष्ट ज्योत्स्नेंत निर्मल
जणू प्रगटले स्पर्श स्वर ते स्वरविस्तारांत
रागिणींतील
अगदी मोजके अस्पष्ट मधुर !

स्वप्नींचा प्रकाश अद्भुत गूढ घेऊन जणूं
त्याच्याच छटांनी
घडविलें होतें अवघें तें दृश्य
कुणा जादूगारें !
आणिक एक तुटून तारा
अत्यंत तेजस्वी निळा हिरवा
फेकीत भोवतीं शलाका तेजाच्या अति सुरम्य
जाहला विलीन अथांग जलांत !

तयानेहि क्षणीं तंद्रींत आपुल्या होऊन बेभान
व्हावया विलीन पूर्ण एकरूप
भोवतालच्या स्वर्गीय सौंदर्यीं
दिधली लोटून आपुली काया
अथांग सागरीं
लावण्य संचयीं !

—तरुण भारत : दिवाळी अंक १९५२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

## मार्गदर्शक

मेघ-दुंदुभि नभीं नादाव्या
एकाचसमयीं शत कित्येक
ध्वनि प्रचंड होऊन तसा
अत्यंत भीषण
जाहला स्फोट !

जवळ करीत तटिनी–जल
निघालों होतों
प्रातःस्नानार्थ
स्नेहाने तुमच्या न्हाऊन आम्ही
–आणि सहसा उडाला भडका !

उभा करीत राक्षसी स्तंभ
निघाला वर धुराचा लोट
नभ स्पर्शाया,
विकाळ ज्वाळांच्या कराल तांडवा
झाला आरंभ !

धूमस्तंभास देऊन वेढे
कनकवर्णी शिखा अग्नीच्या
शिरल्या आकाशीं
पोळीत धूम पोळाया व्योम
करीत स्पर्धा कृष्णस्तंभाशीं
जाहला जागा संहार मूर्त !

प्रथम ठिणग्या ओंजळभर
आमुच्या दिशेने
दुसऱ्या क्षणीं उज्ज्वल ज्वाला
एकीस दुजी देत लपेटा;
पेटले पलिते स्नेहांत माखले
आमुच्या देहांचे पाहतां पाहतां !

हां, हां, नका धावूं
आणाया कुणी घडे पाण्याचे
आण तुम्हांला– अगदी साऱ्यांना
प्राणांची आमुच्या !
जळतों आम्ही ! जळूं द्या अखंड !
आणि निघूं द्या तातडी करून
येथून पुढे !

नवयुग जें यायचें आहे
त्यास दावाया सरळ मार्ग
दाटल्या तमीं
जात आहों आम्ही
होऊन पोत !
जाऊं द्या आम्हां ! जळूं द्या आम्हां !

—अभिरुचि: फेब्रु-मार्च जोडअंक १९५०.

REFBK-0008076
REFBK-0008076

# दिव्य काननीं

अनुक्रम १८४९५ वि: [illegible]
क्रमांक ९३७८ नों: दि: [illegible]

दिव्य काननीं    दिव्य शारदा !
तेजःसीमा    छाया येथ न,
कळीकळीला,
बिंदुबिंदुला    तरंगिणींतिल,
कणाकणाला,
अत्र पवित्रा    आभामयता।
तेजोदानें    लोकविलक्षण    चतुर्थ लोकीं
भव्य शिला नच    कला शशीची
वरी सुरेखा    कलादेवता
वीणाहस्ता    विराजमाना
नादब्रह्मीं    ब्रह्मकुमारी
त्रिगुणातीता    त्रिगुणविधाना
ब्रह्मस्वरूपा
करीत निर्मित    शब्दोच्चारें
इथे चराचर,
रत्नाकरतल    वनभू मंगल
रंगीं मोहक    इंद्रधनूंच्या,
नील मण्यांच्या    द्रवें वाहिनी
गान विमोहित    नील धबधबा
अगदी मौनी,
हरित विभेच्या    रम्य शलाका
लतिका डुलती

झळकत अविरत
सुमसंभारीं
कितीक कौस्तुभ    कर्णकुंडलें    स्यमंतक किती
नक्षत्रांच्या    प्रभाळ माळा
द्युती फाकली    अद्‌भुत ! अद्‌भुत !
इथे चेतना    स्पंदन नुरलें
देवीचरणीं    विनत प्रतिमा    मयूर चंचल
नृत्यविशारद    नृत्य विस्मरे !
येथे जडता—    स्फुरण अलौकिक
उपल होउनी    प्रफुल्ल उत्पल
मधुत बुडाले    द्रवूं लागतां !
एकतानता    एकरूपता    इथे एकता
कंकणगीती    अतीव मंजुळ    वीणावाणी
मधुर झंकृती    कंकणमुक्ता !
काल लागतां    सम दावाया
नादब्रह्मीं    स्वत्व विसरुनी
झाला अगतिक
आणि लाभला    निर्मितीस वर
शाश्वततेचा
दिव्य काननीं !

—युगवाणी : ऑगस्ट १९४७

दा. क्र. ८०७५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १०७०५ वि: काव्य